# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-24.05.2026** **वार- रविवार**

---

**विधानपरिषद**

पुणे विधानपरिषदेची रिक्त जागा भाजपकडेच राहावी, यासाठी पक्षाच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी जोरदार मोर्चेबांधणी सुरू केली आहे. पक्षाकडे सुमारे ३३३ मतदारांचं भक्कम संख्याबळ आहे, त्यामुळे ही जागा भाजपलाच देण्याची मागणी पुणे महापालिकेतील भाजपचे सभागृह नेते गणेश बिडकर यांनी मुख्यमंत्री आणि पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांकडे केली असल्याचं वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे. तर दुसरीकडे पुण्याची जागा अनेक वर्षांपासून राष्ट्रवादी काँग्रेसकडे आहे, असा दावा राष्ट्रवादीच्या नेत्यांकडून केला जात आहे. त्यामुळे आता महायुतीतील अंतर्गत समीकरणांकडे राजकीय वर्तुळाचं लक्ष लागलं आहे.

**खासदार पुरस्कार**

प्राईम पॉईंट फाउंडेशन या खासगी संस्थेद्वारे दिल्या जाणाऱ्या यंदाच्या 'संसद रत्न' पुरस्कारांसाठी १२ खासदार आणि ४ संसदीय समित्यांची निवड झाली आहे. महाराष्ट्रातून मेधा कुलकर्णी, श्रीकांत शिंदे, हेमंत सावरा, स्मिता वाघ, आणि नरेश म्हस्के या खासदारांची या पुरस्काराच्या विविध श्रेणींमध्ये निवड झाली आहे.

तसंच चरणजित सिंह चन्नी यांच्या अध्यक्षतेखालची कृषी समिती, भर्तृहरी महताब यांच्या अध्यक्षतेखालची वित्त समिती, सप्तगिरी शंकर उलका यांच्या अध्यक्षतेखालची ग्राम विकास आणि पंचायती राज समिती आणि अनुराग ठाकूर यांच्या अध्यक्षतेखालची कोळसा आणि खाण समिती, या ४ संसदीय समित्यांची या पुरस्कारासाठी निवड झाली आहे.

**पीएमपी**

पीएमपी प्रशासनाने प्रवासी सेवा अधिक सक्षम करण्यासाठी प्रथमच दोन सॉफ्टवेअर प्रणालींचं एकत्रीकरण केलं असून, त्याचे सकारात्मक परिणाम आता दिसू लागले आहेत. रस्त्यावर धावलेल्या १ हजार ७७० बसपैकी ९३ टक्के बस वेळेत धावल्या आहेत. बसमधील जीपीएस यंत्रणा आणि वाहकांकडील ईटीएम मशीनच्या सॉफ्टवेअरला परस्पर जोडण्यात आल्याने बस संचालनात मोठी सुधारणा झाली आहे. या एकत्रीकरणामुळे एकाच मार्गावर अनावश्यकपणे जास्त बस धावणे किंवा कमी प्रवासी असलेल्या फेऱ्यांचे नियोजन अशा त्रुटींवर नियंत्रण मिळवण्यात प्रशासनाला यश आलं आहे. या आधी बस वेळापत्रकाची जबाबदारी आगार व्यवस्थापकांकडे असल्याने मानवी हस्तक्षेपामुळे परिचालनात अनेक अडचणी निर्माण होत होत्या. या समस्यांवर उपाय म्हणून पीएमपी प्रशासनाने 'इबिक्स' आणि 'कार्गोएफएल' या दोन रिअल टाइम डेटाबेस सॉफ्टवेअरचे एकत्रीकरण केले आहे. यामुळे बस संचालनाचे नियोजन अधिक अचूक आणि परिणामकारक झालं आहे, असं पीएमपीचे अध्यक्ष महेश आव्हाड यांनी सांगितलं.

**परदेशी पर्यटन**

यंदाच्या मार्च महिन्यात भारतीय नागरिकांनी सहली आणि परदेश प्रवासावर फेब्रुवारी महिन्याच्या तुलनेत कमी खर्च केल्याचं भारतीय रिझर्व बँकेनं जारी केलेल्या आकडेवारीत म्हटलं आहे. फेब्रुवारी महिन्यात भारतीय नागरिकांनी परदेश प्रवासावर १ अब्ज ३० कोटी डॉलर्स खर्च केले, तर मार्च महिन्यात हा खर्च १ अब्ज ९ कोटी होता, असं यात म्हटलं आहे. पश्चिम आशियातल्या संघर्षामुळे तेलाच्या किमतीत झालेली वाढ, आणि डॉलरच्या तुलनेत रुपयाची झालेली घसरण, या पार्श्वभूमीवर नागरिकांनी परदेश प्रवास टाळावा, असं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे.

दरम्यान आफ्रिकेतल्या काही देशांमध्ये ‘इबोला’ या आजाराचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता, भारतीय नागरिकांनी पुढची सूचना मिळेपर्यंत काँगो, युगांडा आणि दक्षिण सुदान या भागात प्रवास टाळावा अशी सूचना केंद्र सरकारनं जारी केली आहे. तसंच या देशांमध्ये वास्तव्याला असलेल्या किंवा प्रवास करणाऱ्यांनी स्थानिक प्रशासनानं जारी केलेल्या सूचनांचं पालन करावं असं यात म्हटलं आहे. भारतात अद्याप इबोला आजाराचा एकही रुग्ण आढळला नसल्याचं आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयानं म्हटलं आहे. काँगो आणि युगांडामध्ये गेल्या काही दिवसांमध्ये इबोला आजाराचा प्रादुर्भाव झाल्यानंतर जागतिक आरोग्य संघटनेनं त्याला आंतरराष्ट्रीय चिंतेची बाब म्हणून घोषित केलं होतं.

**<u>नाडकर्णी-भावांजली</u>**

ज्येष्ठ मनोविकारतज्ञ दिवंगत डॉक्टर आनंद नाडकर्णी यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी आणि त्यांच्या कार्याला अभिवादन करण्यासाठी आज पुण्यात भावांजली सभेचं आयोजन करण्यात आलं होतं. यावेळी ज्येष्ठ मनोविकारतज्ञ डॉक्टर सुधीर भावे, अभिनेत्री मृणाल कुलकर्णी, दिग्दर्शक सुनील सुकथनकर, एमकेसीएलचे प्रमुख सल्लागार विवेक सावंत, मुक्तांगणच्या संचालक मुक्ता पुणतांबेकर यांच्यासह विविध मान्यवरांनी, मानसिक आरोग्य या विषयासह विविध विषयांवर आनंद नाडकर्णी यांनी केलेल्या कार्याचं स्मरण केलं.

**<u>प्रदर्शन</u>**

निसर्गाचं ‘प्रतिबिंब’ टिपणाऱ्या १३ हौशी कलाकारांच्या कलाकृतींचं प्रदर्शन आजपासून पुण्यात बालगंधर्व कलादालनात सुरू झालं आहे. वन्यजीव, पक्षी आणि विहंगम निसर्गदृश्य असे विविध विषय या प्रदर्शनातून रसिकांना अनुभवता येणार आहेत. येत्या २६ मे पर्यंत सकाळी १० ते रात्री ८ या कालावधीत हे प्रदर्शन सर्वांना मोफत पाहता येणार आहे.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान ३५ अंश तर किमान तापमान २५ पूर्णांक ४ दशांश अंश सेल्सियस नोंदवलं गेला. उद्या कमाल तापमानात किंचित वाढ होण्याची शक्यता असून दुपारनंतर हलक्या पावसाचाही अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू, विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांत मध्ये, नमस्कार.**